पोलीस स्टेशन गंगापूर छत्रपती संभाजीनगर (ग्रामीण)

**N.C.R.B (एन.सी.आर.बी)**

**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)**

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** छत्रपती संभाजीनगर(ग्रामीण) **P.S.(ठाणे):** गंगापूर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0443 **Year (वर्ष):** 2026

**Date and Time of FIR (प्र. ख. दिंनाक आणि वेळ):** 11/09/2026 05:54

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** गुरूवार

**Time Period (कालावधी):** पहर 8

**Date From (दिंनाक पासून):** 10/09/2026

**Date To ( दिंनाक पर्यंत):** 10/09/2026

**Time From (वेळेपासून):** 22:57 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 23:00 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिंनाक ):** 11/09/2026 **Time (वेळ):** 05:45 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 006

**Date & Time (दिंनाक आणि वेळ):** 11/09/2026 05:45 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

दक्षिण **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** पोलीस ठाणे गंगापुर,परिसरातील कक्षामध्ये, गंगापुर,गंगापुर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** राजु भाऊलाल नांगलोत

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1984

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबधक विभाग,छत्रपती संभाजीनगर ,शहर चौक,छत्रपती संभाजीनगर शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबधक विभाग,छत्रपती संभाजीनगर ,शहर चौक,छत्रपती संभाजीनगर शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-7720872555

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | शकील सत्तार शेख - पोहेकाँ 1115 | | | 1. पोलीस ठाणे गंगापुर,गंगापुर, गंगापूर,छत्रपती संभाजीनगर (ग्रामीण),महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

**11.Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
| --- | --- |

**12.First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दि. 11/09/2026

मी राजु भाऊलाल नांगलोत वय 42 वर्षे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिंबधक विभाग, छत्रपती संभाजीनगर
मो नं. 7720872555

मी दिनाक 10/09/2026 रोजी ला.प्र.वि. कार्यालय, छत्रपती संभाजीनगर कार्यालयात हजर असताना, मला मा. पोलीस अधीक्षक यांनी त्यांचे कक्षात बोलावुन घेवुन समक्ष हजर असलेले तक्रारदार स्वप्नील गणेश गायकवाड, वय-30 वर्षे व्यवसाय- मजुरी रा. मारवाडी गल्ली गंगापुर पोलीस ठाणे जवळ ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर यांची ओळख करुन देवुन, त्यांची लाचे संदर्भात तक्रार असल्याचे सांगुन त्यांचे तक्रारीवर कारवाई करणेसाठी पंच उपलब्ध करुन घेवुन पुढील कारवाई करणेबाबत आम्हास तोंडी आदेश दिला. त्यावेळी आम्ही सदर तक्रारदार यांना तक्रारीबाबत विचारपुस केली असता त्यांनी कळविले की तुम्ही गंगापुर येथे चला मी तुम्हाला तेथे लेखी तक्रार देतो असे कळविल्याने आम्ही तक्रारदार, पंच व सापळा पथक आवश्यक त्या सर्व साहित्यासह खाजगी वाहनाने व तक्रारदार हे त्यांचे खाजगी वाहनाने लाचलुचपत प्रतिंबधक विभाग, छत्रपती संभाजीनगर कार्यालयातुन 17.00 वाजता निघुन 19.30 वाजता गंगापुर येथे ठिकाणी सुरक्षित ठिकाणी पोहोचलो. तेव्हा आम्ही तक्रारदार व पंचाना लाचमागणी पडताळणी कारवाईचे अनुषंगाने योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर तक्रारदार यांनी त्यांची तक्रार लेखी लिहुन दिली. ती पुढील प्रमाणे.

" मी स्वप्नील गणेश गायकवाड, वय-30 वर्षे व्यवसाय- मजुरी रा. मारवाडी गल्ली गंगापुर पोलीस ठाणे जवळ ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर.शिक्षण-12 वी मो.न. 8600300678

पोलीस निरीक्षक श्री राजु नांगलोत लाचलुचपत प्रतिंबधक विभाग, छत्रपती संभाजीनगर, यांचेकडे दोन पंचासमक्ष पोलीस ठाणे गंगापुर येथील पोलीस शकील शेख, यांचेकडुन मला लाचेची मागणी होत असले बाबत तक्रार देतो की, मी वरील प्रमाणे असुन मजुरी करुन कुटंबाचा उदर निंवाह करतो, माझेवर पाच-सहा वर्षापुर्वी कलम 307, 353 प्रमाणे पोलीस ठाणे गंगापुर येथे गुन्हा दाखल झाला होता, त्याचा सेशन केस नंबर 438/2025 असा होता. सदर केस मध्ये माझ्या गंगापुर न्यायालयात तारखा चालु होत्या. दरम्यान काळात मला माझे वकीलाने न कळविल्यामुळे तसेच मजुरी कामानिमीत्त बाहेरगावी असल्यामुळे मी मा. न्यायालयात तारखेवर हजर राहु शकलो नव्हतो. त्यामुळे माझे मा. न्यायालयाने अटक वॉरंट काढले होते.

आज दिनाक 10/09/2026 रोजी माझे मित्र अमोल सुभाषराव जगताप (दादा)रा. गंगापुर यांना त्यांचे मोबाईल फोनवर पोलीस ठाणे गंगापुर येथील पोलीस शकील शेख यांनी कळविले की, स्वप्निलचे सेशन केस नंबर 438/2025 कलम 307, 353 मध्ये अटक वॉरंट निघाले असुन त्याला अटक होईल त्यामुळे त्याला जेल मध्ये जावे लागेल तुम्हाला जेल मध्ये पाठवायचे नसेल तर 5,000/- रुपये दयावे लागतील. जर पैसे दिले नाहीतर त्यास जेल मध्ये जावे लागेल त्यासाठी तुम्ही स्वप्नीलला माझ्याकडे पाठवुन दया. असे अमोल दादा यांना सांगितले. तेव्हा मला अमोल दादा यांनी वरील प्रमाणे पोलीस शकील शेख यांनी अटक न करण्यासाठी व जेल मध्ये न जाण्यासाठी पोलीस शकील शेख 5,000/- रुपये लाच म्हणुन मागत असल्याबाबत सांगितले. परंतु मला शकील पोलीस यास लाच देण्याची इच्छा नाही. म्हणुन मी त्यांचे विरुध्द कारवाई होणे करिता आपल्याकडे तक्रार करीत आहे. मी आज दिनाक 10/09/2026 रोजी पोलीस ठाणे गंगापुर येथील पोलीस शकील शेख यांची भेट घेऊन त्यांना वॉरंट मध्ये अटक करुन जेल मध्ये न पाठविण्याची विंनती करणार आहे. तेव्हा शेख शकील यांनी लाचेची मागणी केल्यास त्यांचेवर कायदेशीर कारवाई करावी ही विंनती माझा पोलीस शकील शेख यांच्यासोबत कोणताही पैशाचा देण्याचा घेण्याचा किंवा उसनवारीचा व्यवहार नसुन वैर दुश्मनी नाही." वगैरे मजकुराची लेखी तक्रार दिल्याने सदर तक्रारीवर तक्रारदार,आम्ही व दोन्ही पंचानी सहया केल्या. सदर तक्रारीचे अनुषंगाने पोलीस ठाणे गंगापुर, छत्रपती संभाजीनगर (ग्रामीण) येथे पोलीस शेख शकील यांची तक्रारीचे अनुषंगाने लाचमागणी पडताळणी करणार आहोत असे सांगीतले.

पोलीस शकील शेख यांची भेट घेण्यासाठी मी त्यांचे मोबाईल फोनवर फोन लाऊन विचारले असता त्यांनी पोलीस ठाणे गंगापुर येथे रात्री 10 वाजता आधार कार्ड घेऊन येण्याचे सांगितले.

त्यानंतर शासकीय डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर काढुन त्यामध्ये HIKVISION कंपनीचे 8 जीबी क्षमतेचे नवीन मेमरी कार्ड पंचांचे समक्ष घालुन, त्यामध्ये यापुर्वीचे कोणतेही ध्वनीमुद्रीत संभाषण नसलेची तक्रारदार श्री. स्वप्नील गायकवाड व पंचाना खात्री करुन दिली. त्यानंतर पडताळणी कारवाईचे अनुषंगाने शासकीय व्हाईस रेकॉर्डर 22.05 वाजता चालु करुन तो तक्रारदार श्री. स्वप्नील गायकवाड यांचे गळयात दोऱ्याचे सहाय्याने अडकवुन तक्रारदार यांना पोलीस शकील शेख यांची भेट घेण्यासाठी पोलीस ठाणे गंगापुर येथे पंच क्र. 1 यांचेसह रवाना केले. त्यानंतर तक्रारदार व पंच क्र. 1 असे 22.18 वाजता सापळा पथक थांबलेल्या सुरक्षीत ठिकाणी परत आले. तेव्हा तक्रारदार यांचे गळ्यातील व्हाईस रेकॉर्डर काढुन बंद केला.

त्यानंतर आम्ही पंच क्रं. 2 यांचे समक्ष पंच क्र. 1 यांना तक्रारदार यांना शासकीय व्हाईस रेकॉर्डर चालु करुन दिंल्यानतर पोलीस शकील शेख यांना भेटण्यास गेल्यानंतर तेथे काय घडले याबाबत विचारले असता त्यांनी सांगीतले की, " मी तक्रारदार श्री. स्वप्नील गायकवाड असे रेकॉर्डर चालु करुन दिंल्यानतर तक्रारदार यांनी पोलीस शकील शेख यांना फोन लावुन विचारले की, शेख साहेब कुठे होते, पोलीस स्टेशनला आलो होतो त्यानंतर पोलीसाच्या ड्रेस मध्ये एक पोलीस आले तेव्हा त्यांची मी छातीवरील नेमप्लेट पाहीली असता त्यावर नेमप्लेट पोहेकॉ/ शकील सत्तार शेख असल्याचे दिसुन आले. त्यानंतर शकील सत्तार शेख हे पोलीस स्टेशनच्या परिसरातील एका खोलीत जाऊन बसले व तक्रारदार यांना म्हणाले की, सरळ सरळ सांगिंतल तुला जगताप भाऊला तेच सांगिंतल, मेकु अगर उठाने का है तो डायरेक्ट जाके उठाऊंगा, इसकु उसकु बोल के फिरुंगा, तुझ्यावर तिनशे सात तिनशे त्रेपनची केस आहे. कोणासोबत केलता तिनशे त्रेपन्न शासकीय कर्मचारी कोण होता, तेव्हा तक्रारदार म्हणाले की, घुसिंगे साहेब होते, तेव्हा शकील शेख म्हणाले की, यार मी तुला उचलुन न्यायला पाहीजे होतं खरंच, मी नंतर पाहील, तु मोठा गुंड हे यार, अटक कराची असती ना सरळ घरी जातो उचलुन आणतो डायरेक अटक करुन टाकतो, दादाला सांग पैशाचं तेव्हा तक्रारदार म्हणाले की, किती तेव्हा पोलीस शकील म्हणाले की, पाच तेव्हा तक्रारदार म्हणाले की, पाच हजार लई होऊन जाते ना साहेब, तेव्हा पोलीस शकील म्हणाले की, तुझं बेलेबल वॉरंट नही ना त्या दिवशी मी दोन हजारात करुन दिंलत तेव्हा तक्रारदार म्हणाले की, पाच हजार लई होऊन जाता साहेब तेव्हा पोलीस शकील म्हणाले की, मग किती देतो तक्रारदार म्हणाले की, तीन हजार देतो त्यावर पोलीस शकील म्हणाले की, जाय घेऊन ये असे सांगितले. सदर संभाषणातुन पोलीस शकील शेख यांनी तक्रारदार यांना अटक वॉरंट मध्ये अटक न करण्यासाठी 5,000/- रुपयेची लाचमागणी करुन तडजोडी अंती 3,000/- लाच स्विकारण्याचे मान्य केल्याचे लाचमागणी पडताळणी मध्ये निष्पन्न झाले. त्यानंतर आम्ही पोलीस शकील शेख यांचेवर सापळा कारवाई करण्याचा निंणय घेतला.

त्यानंतर तक्रारदार श्री. स्वप्नील गायकवाड यांना लाच रक्कम बाबत विचारणा केली, त्यावेळी त्यांनी त्यांचेकडील 500/- रुपये दराच्या 06 भारतीय चलनी नोट असे 3,000/- रुपये लाच रक्कम उपलब्ध केली. त्यानंतर आम्ही तक्रारदार श्री. स्वप्नील गायकवाड व पंचांना अँथ्रासिन पावडरचे गुणधर्म समजावुन, अल्ट्रा व्हायलेट दिव्याचे प्रकाशात हिरवट रंगाची चकाकी असलेबाबत खात्री करुन दिली. त्यानंतर सापळा कारवाईचे अनुषंगाने सापळापुर्व संपुर्ण कार्यवाही केलेनंतर अँथ्रासिन पावडर लावलेले 3,000/- रुपये तक्रारदार श्री. स्वप्नील गायकवाड यांचे शर्टचे डावे बाजुचे छातीवरील खिशात ठेवले. त्यानंतर तक्रारदार, दोन्ही पंच व सापळा पथकास सापळा कारवाईचे अनुषंगाने सुचना देवुन, तक्रारदार यास पोलीस शकील शेख यांनी लाच रक्कम स्विंकारल्यानतर त्यांनी त्यांचेकडील रुमालाने चेहरा पुसण्याचा इशारा करण्याची सुचना दिली. त्यानंतर पंचांसमक्ष पुन्हा सापळा कारवाईचे अनुषंगाने व्हाईस रेकॉर्डर मध्ये HIKVISION कंपनीचे 8 जीबी क्षमतेचे नवीन मेमरी कार्ड घालुन 22.52 वा चालु करुन तो तक्रारदार श्री. स्वप्नील गायकवाड यांचे गळयात अडकवुन तक्रारदार व पंच क्रं 1 यांना सापळा कारवाई कामी पोलीस शकील शेख यांची भेट घेण्यासाठी रवाना केले. त्यांचे पाठोपाठ आम्ही सोबत पंच क्रं. 2 व सापळा पथक असे आमचेकडील खाजगी वाहनाने तक्रारदार यांच्या पाठोपाठ सुरक्षित अंतरावर पोलीस ठाणे गंगापुर च्या परिसरात तक्रारदार नजरेत राहील अशा रितीने दबा धरुन थांबलो. त्यानंतर तक्रारदार यांनी रुमालाने तोंड पुसण्याचा लाच स्विकृतीचा 22.57 वा. पुर्व नियोजीत ईशारा केला. तेव्हा सापळा पथक सक्रीय होऊन लागलीच तक्रारदार व पंच क्र. 01 यांचे जवळ आलो तेव्हा तक्रारदाराचे गळयातील व्हाईस रेकॉर्डर बंद करण्यात आला. त्यानंतर आम्ही सर्व सापळा पथक, तक्रारदार व पंच क्रं. 2 यांचेसमक्ष पंच क्रं. 1 यास सुरक्षीत ठिकाणावरुन निघाल्यापासुन ते नियोजीत इशारा होईपर्यंत काय घडले याबाबत विचारले असता, पंच क्रं.1 याने सांगीतले की, "मी व तक्रारदार असे पोलीस शकील शेख यांची भेट घेण्यासाठी पोलीस ठाणे गंगापुर परिसरातील पोलीस शेख शकील बसलेल्या कक्षात गेले व पोलीस शकील शेख यास म्हणाले की, हे तीन हजार रुपये सांगितले होते ना तुम्ही तेव्हा

पोलीस शकील शेख म्हणाले की, काम लय मोठं हे तुहय मी लया शॉटकट केलं तेव्हा पोलीस शकील शेख यांनी तक्रारदार यांना इशाऱ्यानं त्यांचे समोरील टेबलवर अँथ्रासीन पावडर लावलेली लाचेची रक्कम 3,000/- रुपये ठेवण्यास सांगितली. त्यावरुन तक्रारदार यांनी अँथ्रासीन पावडर लावलेली लाचेची रक्कम 3,000/- रुपये पोलीस शकील शेख यांचे टेबलवर ठेवली " त्यानंतर आपण पोलीस शकील शेख यांना ताब्यात घेतले असे सांगितले. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना विचारपुस केली असता त्यांनी पंच क्र. 1 यांचे प्रमाणेच हकीगत सांगितली. त्यानंतर आम्ही पंचासमक्ष पोलीसाचे नाव पत्ता विचारले असता त्यांनी त्यांचे नाव शकील सत्तार शेख, वय- 42 वर्षे, व्यवसाय- नोकरी पद- पोलीस हवालदार/1115 नेमणुक पोलीस ठाणे गंगापुर, छत्रपती संभाजीनगर (ग्रामीण) रा. गाजगाव ता. गंगापुर जिल्हा छत्रपती संभाजीनगर असे असल्याचे सांगीतले. तेव्हा आम्ही त्यांना आमची ओळख करुन देवुन लाचेची रककम कोठे ठेवली याबाबत विचारले असता त्यांनी स्विकारलेली लाचेची रक्कम 3,000/- रु. पोह/शकील शेख यांचे टेबलवरुन पंच क्र.2 यांचे मार्फतीने ताब्यात घेवुन सापळा पुर्व कारवाईवेळी तक्रारदार याने दिलेल्या नोटांशी खात्री करता एकच असल्याचे दिसुन आले. आरोपी लोकसेवक पोलीस हवालदार शकील शेख यांना ताब्यात घेवुन त्यानंतर पुढील कारवाई कामी ला.प्र.वि. कार्यालय छत्रपती संभाजीनगर येथे येवुन पंचनामा करुन कारवाई पुर्ण केली आहे.

तरी दि. 10/09/2026 रोजी 22.57 वाजता पोलीस ठाणे गंगापुर, परिसरातील कक्षामध्ये आरोपी लोकसेवक श्री. शकील सत्तार शेख, वय- 42 वर्षे, व्यवसाय- नोकरी पद- पोलीस हवालदार/1115 नेमणुक पोलीस ठाणे गंगापुर, छत्रपती संभाजीनगर (ग्रामीण) रा. गाजगाव ता. गंगापुर जिल्हा छत्रपती संभाजीनगर यांनी मुळ तक्रारदार श्री. स्वप्नील गणेश गायकवाड, वय-30 वर्षे व्यवसाय- मजुरी रा. मारवाडी गल्ली गंगापुर पोलीस ठाणे जवळ ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर यांचे सेशन केस नंबर 438/2025 कलम 307, 353 मध्ये मा. न्यायालयाने काढलेल्या अटक वॉरंट मध्ये अटक न करण्यासाठी 5,000/- रुपये लाचेची मागणी करुन तडजोडी अंती 3,000/- रुपये लाच रक्कम स्विकारली आहे. म्हणुन लोकसेवक श्री. शकील सत्तार शेख यांचे विरुध्द माझी भ्रष्टाचार प्रतिबधक अधिनियम सन 1988 चे कलम 7 प्रमाणे सरकार तर्फे कायदेशिर फिर्याद आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

Salim Amar Chaous(I (Inspector)) / PI **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**Registered by** (नोंदणी अधिकारी)

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): Salim Amar Chaous
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): PI

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अमलदार
पोलीस ठाणे गंगापूर.
छत्रपती संभाजीनगर (ग्रामिण)